# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

## मा. ह प्रभाग समिती सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ४

## (सभावृत्तांत)

दिनांक -- ०६/११/२०१७ वेळ -- दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समिती मासिक सभा सोमवार **दिनांक ०६/११/२०१७** रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयातील सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा. नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

१) **मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत** सभापती
२) मा.शाम गणपतराव लांडे
३) मा.सुजाता सुनिल पालांडे
४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ
५) मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत
६) मा. रोहित (आप्पा) सुदाम काटे
७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र
८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय
९) मा. संतोष बबन कांबळे
१०) मा. सोनवणे शारदा हिरेन
११) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
१२) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.संजय घुबे (कार्यकारी अभियंता स्था.), श्री.कैलास थोरात (कार्यकारी अभियंता वि.), श्री.पवार आर.एम. (कार्यकारी अभियंता पा.पु.), श्री.शिरीष पोरेडी (उप.अभियंता स्था.), श्री.विजयसिंह भोसले (उप.अभियंता स्था.), श्री.धुमाळ दिलीप (उप.अभियंता वि.), श्री.जावळे आर.के (उप.अभियंता पा.पु), श्री.दवंडे शशिकांत (उप.अभियंता पा.पु.), श्री.सुनिलदत्त नरोटे (उप.अभियंता स्थापत्य/उद्यान), श्री.संतोष लांडगे (वृक्षसंवर्धन उद्यान सहाय्यक), श्री.ज्ञानेश्वर सासवडकर (सहा.आरोग्य अधिकारी), श्री.जे.व्ही.पटेल (उद्यान निरीक्षक), श्री.उत्तम चपटे (कार्यालय अधिक्षक), श्री.पारसी एम.एस. (आ.नि.पशु वैद्यकिय विभाग), श्री.शहाजी माळी (मुख्य आरोग्य निरीक्षक), श्री.चौहान सुनिल (आ.नि.), श्री.संजय मानमोडे (आ.नि.), श्री.इंगेवाड सतिश, (आ.नि.), श्रीम.रश्मि तुंडलवार (आ.नि), श्री.उध्दव डवरी (आ. नि.), श्री.जितेंद्र देवकर (क.अ.), श्री.समीर दळवी (क.अ.), श्री. दांगडे एस.डी. (क.अ.), श्री.दिग्विजय पवार ( क.अ.), श्री.अमर जाधव

(क.अ.), श्रीम.अंकिता मोरे ( क.अ.), श्री.व्ही.टी. अवसरे ( क.अ.), श्री.दिक्षित ए.ए. (क.अ.), श्रीम. वंदना मोरे (क.अ.), श्री.शेख एस.के. (क.अ.), श्रीम.प्रिती यादव (क.अ.), श्री.संदीप लोहकरे (क.अ.), श्री.जिंतीकर आर. एन. (क.अ.), श्री.भंडारी एम.पी. (क.अ.) इ.अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती –** उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे. दि. ५/१०/२०१७ ( कार्यपत्रिका क्र.३ ) रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले --**

विषय क्र.१) संत गोरा कुंभार सांगवी प्रभाग क्र. ३२ मधील गार्डनमधील नविन खेळणी बसविणे तसेच गार्डनमधील गवत ( लॉन ) व्यवस्थित करुन स्वच्छ करणे, नको असलेली छोटी छोटी झुडपे काढून टाकणेबाबत -- मा.उषा उर्फ माई ढोरे, मा. शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) प्रभाग क्र.३२ मधील ६० फुटी रस्त्याला नविन विद्युत पोल दोन्ही बाजुने बसविणे तसेच संगमनगर मधील पुर्वेला जयराम रेसिडेन्सी समोरील दक्षिण – उत्तर रस्त्याला नविन दोन्ही बाजुने पोल टाकणेस येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत -- मा.उषा उर्फ माई ढोरे, मा. हर्षल ढोरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) प्रभाग क्र.३२ सांगवी येथील, शिवदत्त नगर रस्त्याचे "कै.दत्तात्रय रामचंद्र जगताप" असे नामकरण करणेबाबत -- मा. हर्षल ढोरे, मा.उषा उर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४) प्रभाग क्र.३१ मधील एम.के. हॉटेल कवडेनगर येथील सार्वजनिक पुरुष व महिला टॉयलेट बदलुन त्याठिकाणी नविन पद्धतीचे (वॉटर लेस) पुरुष व महिला टॉयलेट बसविणेबाबत व दैनंदिन घरोघर जावून कचरा गोळा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या घंटागाड्या सतत नादुरुस्त व लहान असल्याने त्यामध्ये कचरा कमी प्रमाणात जमा केला जातो त्याकरिता नविन मोठ्या घंटागाड्या घेणेबाबत -- मा.माधवी राजापुरे, मा. सीमा चौगुले यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) प्रभाग क्र.३० फुगेवाडी स्मशानभुमी आधुनिक पध्दतीने बांधुन मिळणेबाबत -- मा.स्वाती (माई) काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६) प्रभाग क्र.३० फुगेवाडी या गावाच्या मुख्य रस्त्याला स्वागत कमान (आर.सी.सी.) करणेबाबत -- मा.स्वाती (माई) काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.७) प्रभाग क्र.३० मधील दापोडी गावात एस.टी.रोड, भोसले वाईन्स शेजारी, स्वागत कमान (आर.सी.सी.) करणेबाबत --- मा.स्वाती (माई) काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.८) प्रभाग क्र.३० मधील दापोडी येथे आतार विटभट्टी या परिसरात "कै.संजय पांडूरंग काटे पथ व कै.संजय पांडूरंग काटे नगर" अशा नावाचे फलक लावणेबाबत -- मा.स्वाती (माई) काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.९) प्रभाग क्र.३० दापोडी सर्वे नं. ८५ आरक्षण क्र. ३/३१ येथे असलेले नियोजित उद्यानाच्या प्रवेशद्वारास "कै.सौ. रेखा रोहित काटे" असे नांव देणेबाबत -- मा. राजू बनसोडे , मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१०) प्रभाग क्र.३० दापोडी येथे गणपती विर्सजन घाट तयार करणेबाबात -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.११) प्रभाग क्र.३० मध्ये विविध ठिकाणी जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी दादांचा कट्टा या नावाने शेडची उभारणी करणेबाबत -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१२) प्रभाग क्र.३० मधील प्रमुख रस्त्यावरील चौकांचे सुशोभिकरण करणेबाबत -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१३) प्रभाग क्र.३० कासारवाडी येथे विकासासाठी योगदान केलेले दिवंगत सामाजिक कार्यकर्ते मरहुम – गुलाम दस्तगीर शेख ( पथ ) (रेल्वे गेट ते स्मशानभूमी समोर) यांच्या नावाचे चौकांना ( पथांना ) नामफलक बसविणेबाबत --- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१४) प्रभाग क्र.३० कासारवाडी येथे कै. बबनराव लक्ष्मणराव कुतथे (पथ) (साई कुंज सोसायटी ते शास्त्रीनगर रोड) यांच्या नावाचे चौकांना ( पथांना ) नामफलक बसविणेबाबत -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१५) प्रभाग क्र.३० दापोडी स्मशानभूमी येथे दशक्रिया विधी घाट विकसित करणेबाबत - मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१६) प्रभाग क्र.३० मधील रामभाऊ काटे पुलाखालील वाहनतळ "रोहितराज युवा प्रतिष्ठान" या संस्थेस ५ वर्षाच्या करारावर चालविण्यास मिळावे, त्यामुळे जी वाहने रस्त्यावर उभी राहतात ती रस्त्यात न उभी राहता वाहनतळात उभी राहतील व वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागेल -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१७) प्रभाग क्र.३० दापोडी येथे "श्री फिरंगाई देवी समस्त गावकरी उत्सव समिती दापोडी" व गणेशनगर येथील रामभाऊ काटे पुलालगत स्वागत कमान तसेच कासारवाडी येथे ही स्वागत कमान व फुगेवाडी गावठाण येथे स्वागत कमान करुन मिळणेबाबत -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१८) प्रभाग क्र.३० मधील दापोडी येथे एस.टी. वर्कशॉप (पाच बंगला) येथे जाणाऱ्या रोडच्या दोन्ही बाजुस जाँगिंग ट्रँक विकसित करणेबाबत -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१९) प्रभाग क्र.३० फुगेवाडी गावठाण येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पुढे घेऊन त्याचे सुशोभिकरण करणेबाबत -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२०) प्रभाग क्र.३० दापोडी येथील मनपा हुतात्मा भगतसिंग विद्यामंदिर शाळेची धोकादायक इमारत पाडुन नविन इमारत बांधणेबाबत -- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्र - १६ | विषय क्र - १
दि - ६/११/२०१७ | विभाग - उद्यान स्थापत्य
सुचक - मा.उषा उर्फ माई ढोरे | अनुमोदक - मा.शारदा सोनवणे
संदर्भ - मा.उषा उर्फ माई ढोरे, मा.शारदा सोनावणे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

संत गोरा कुंभार सांगवी प्रभाग क्र. ३२ मधील गार्डनमधील नविन खेळणी बसविणे तसेच गार्डनमधील गवत ( लॉन ) व्यवस्थित करुन स्वच्छ करणे, नको असलेली छोटी छोटी झुडपे काढून टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र -१७ | विषय क्र - २
दि - ६/११/२०१७ | विभाग - विद्युत
सुचक - मा.उषा उर्फ माई ढोरे | अनुमोदक - मा.हर्षल ढोरे
संदर्भ - मा. उषा उर्फ माई ढोरे, मा.हर्षल ढोरे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३२ मधील ६० फुटी रस्त्याला नविन विद्युत पोल दोन्ही बाजुने बसविणे तसेच संगमनगर मधील पुर्वेला जयराम रेसिडेन्सी समोरील दक्षिण – उत्तर रस्त्याला नविन दोन्ही बाजुने पोल टाकणेस येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - १८
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.हर्षल ढोरे

विषय क्र - ३
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा.उषा उर्फ माई ढोरे

संदर्भ - मा. हर्षल ढोरे, मा.उषा उर्फ माई ढोरे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३२ सांगवी येथील, शिवदत्त नगर रस्त्याचे **"कै.दत्तात्रय रामचंद्र जगताप"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्र - १९
दि - ६/११/२०१७
सुचक - मा. माधवी राजापुरे

विषय क्र - ४
विभाग - आरोग्य
अनुमोदक - मा. सीमा चौगुले

संदर्भ - मा.माधवी राजापुरे, मा. सीमा चौगुले यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३१ मधील एम.के. हॉटेल कवडेनगर येथील सार्वजनिक पुरुष व महिला टॉयलेट अत्यंत खराब झालेले आहेत. त्याची दुर्गंधी परिसरात पसरत असते त्यामुळे सदर टॉयलेट तातडीने बदलुन त्या ठिकाणी नविन पद्धतीचे (वॉटर लेस) पुरुष व महिला टॉयलेट बसविणेस व घरोघर जावून दैनंदिन कचरा गोळा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या घंटागाड्या सतत नादुरुस्त व लहान असल्याने त्यामध्ये कचरा कमी प्रमाणात जमा केला जातो, त्याकरिता नविन मोठ्या घंटागाड्या घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - २०
दि. ६/११/२०१७
सुचक -- मा.स्वाती (माई) काटे

विषय क्र - ५
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा. स्वाती ( माई ) काटे व मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० फुगेवाडी येथील स्मशानभुमी खुप जुनी झालेली आहे. अधुन - मधुन किरकोळ दुरुस्ती करुन काम चालविले जाते. कारण काही भिंतीचे व स्लॅबचे पोपडे निघाले आहेत.तर काही ठिकाणी वरील शेडचा पत्रा फाटलेला आहे. पाण्याचे नळ तुटलेले आहे. पदपथावरील कॉंक्रीट उचकटून खड्डे पडलेले आहेत व स्मशानभुमीचे प्रवेशद्वार खचलेले आणि कोलमडलेले आहेत. वेळेच्या गरजेनुसार व वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन आधुनिक पध्दतीची स्मशानभुमी बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

विषय क्र - ६
विभाग - स्थापत्य
अनुमोदक:- मा. राजू बनसोडे

ठराव क्र - २१
दि - ६/११/२०१७
सुचक:- मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ:- मा. स्वाती (माई) काटे व मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील फुगेवाडी या गावाच्या मुख्य रस्त्याला स्वागत कमान (आर.सी.सी.) बांधणेस व फुगेवाडी गावाला प्रवेशद्वार करुन फुगेवाडी गावाचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

विषय क्र - ७
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

ठराव क्र - २२
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. स्वाती (माई) काटे व मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील दापोडी गावात एस.टी.रोड लगत सर्वसामान्य लोकांची मोठी लोकवस्ती आहे. परंतु एवढया मोठया परिसराला कोणत्याही प्रकारचे शोभेल अशी ओळख नसून त्या परिसरातील मोठी लोकसंख्या सुशिक्षित व सर्वसामान्य लोक वर्ग असून व मुख्य रस्ता आहे. परंतु त्या रस्त्याला शोभेल अशी सुशोभीत स्वागत कमान (आर.सी.सी.) करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

विषय क्र - ८
विभाग – स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

ठराव क्र - २३
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. स्वाती (माई) काटे व मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील दापोडी येथे आतार विटभट्टी या परिसरात पूर्वी कै.संजय पांडूरंग काटे या नावाचा फलक होता. परंतु काही दिवसापासून तो फलक दिसत नसून **"कै.संजय पांडूरंग काटे पथ व कै.संजय पांडूरंग काटे नगर"** या नावाचे फलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - २४
दि - ६/११/२०१७
सुचक - मा. राजू बनसोडे

विषय क्र - ९
विभाग - उद्यान स्थापत्य
अनुमोदक - मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. राजू बनसोडे व मा.स्वाती (माई) काटे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील स.नं. ८५ आरक्षण क्र. ३/३१ येथे असलेले नियोजित उद्यानास **"कै.सौ. रेखा रोहित काटे"** असे नाव करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - २५
दि -६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र - १०
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडीत जुना गणपती विसर्जन घाट हा हॅरीस ब्रीज येथे आहे. पण गणपती विसर्जन मिरवणुकीच्या दरम्यान प्रचंड वाहतुक कोंडी होते. व रेल्वे क्राँसींग येथे अनेक देखावे अडकतात. त्यामुळे पिंपळे गुरव पुलाजवळ सर्वे नं. ११ ( १२ मीटर रोड लगत ) दापोडी येथे गणपती विर्सजन घाट विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

ठराव क्र - २६
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र - ११
विभाग – स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ:- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मध्ये विविध ठिकाणी ज्येष्ठ नागरीकांना बसण्यासाठी **"दादांचा कट्टा"** या नावाने शेडची उभारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्र - २७
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र -१२
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३०, दापोडी येथील शितळादेवी, आंबेडकर पुतळा चौक व इतर प्रमुख चौक दापोडीतील, कासारवाडीतील विसावा हॉटेल जवळील चौक व फुगेवाडीतील प्रमुख रस्त्यावरील चौकांचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

ठराव क्र - २८
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र - १३
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ:- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० कासारवाडी येथे विकासासाठी योगदान केलेले दिवंगत सामाजिक कार्यकर्ते **"मरहुम - गुलाम दस्तगीर शेख (पथ)"** (रेल्वे गेट व स्मशानभूमी समोर) यांच्या नावाचे चौकांना (पथांना) नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

ठराव क्र - २९
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र - १४
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० कासारवाडी येथे गावातील विकासासाठी योगदान केलेल्या दिवंगत सामाजिक कार्यकर्ते **"कै. बबनराव लक्ष्मणराव कुतथे (पथ)"** (साई कुंज सोसायटी ते शास्त्रीनगर रोड) यांच्या नावाचे चौकांना (पथांना) नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्र - ३०
दि - ६/११/२०१७
सुचक:- मा.रोहित काटे

विषय क्र - १५
विभाग - स्थापत्य
अनुमोदक:- मा. राजू बनसोडे

संदर्भ:- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी स्मशानभुमी दशक्रिया विधी घाट विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------

ठराव क्र - ३१
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र -१६
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा.राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील स्वातंत्र्य सेनानी रामभाऊ काटे पुलाखालील वाहनतळ **"रोहितराज युवा प्रतिष्ठान"** या संस्थेस ५ वर्षाच्या करारावर चालविण्यास मिळावे, त्यामुळे जी वाहने रस्त्यावर उभी राहतात ती रस्त्यात उभी न राहता वाहनतळात उभी राहतील व वाहतुक कोंडीचा प्रश्न मार्गी लागेल, त्याकरीता **"रोहितराज युवा प्रतिष्ठान"** या संस्थेस वाहनतळ चालविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्र - ३२
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र -१७
विभाग – स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ:- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी येथे **"श्री.फिरंगाई देवी समस्त गावकरी उत्सव समिती दापोडी"** तसेच गणेशनगर येथील रामभाऊ काटे पुलालगत स्वागत कमान, कासारवाडी व फुगेवाडी गावठाण येथे स्वागत कमान ( आर.सी.सी.) उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ३३
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र - १८
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील दापोडी येथे एस.टी. वर्कशॉप (पाच बंगला) येथे जाणाऱ्या रोडच्या दोन्ही बाजुस जॉगिंग ट्रॅक विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

ठराव क्र - ३४
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र - १९
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा.राजू बनसोडे

संदर्भ:- मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० फुगेवाडी गावठाण येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पुढे घेऊन त्याचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्र - ३५
दि - ६/११/२०१७
सुचक - मा.रोहित काटे

विषय क्र - २०
विभाग - स्थापत्य
अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा.रोहित काटे, मा. राजू बनसोडे यांचा दि. ६/११/२०१७ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी येथील मनपा (हुतात्मा भगतसिंग विद्यामंदीर) शाळा ही सध्या मोडकळीस आली आहे. शाळेचे स्लॅब कधीही कोसळू शकतात अश्या अवस्थेत तेथे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी त्वरीत मनपा शाळेची इमारत पाडून नविन इमारत बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

(मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे)
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. ह्क्षेका/सभा//कावि/ ३० / २०१७
दिनांक - १५ / ११ / २०१७

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर